२०० रुपयात शेत मोजणी
GR

भूमि अभिलेख

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

# जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय

नविन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, विधानभवन समोर, पुणे ४११००१
दुरध्वनी क्रमांक - ०२०/२६०५०००१ ई-मेल dlrmah.mah@nic.in

---

क्र./भूमापन-२/ १८५१७२२ / पोट हिस्सा मोजणी फी/२०२६ पुणे, दिनांक१९/०३/२०२६

परिपत्रक:-

**विषय:- एकत्र कुटुंबाचे धारण जमिनीचे नोंदणीकृत वाटणी पत्र आधारे विभाजन /महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ८५ अन्वये विभाजन / संमतीने पोटहिस्सा/नोंदणीकृत वाटप / दिवाणी आदेशान्वये वाटप नुसार पोटहिस्सा मोजणी फी बाबत.**

महाराष्ट्र राज्यामध्ये ७/१२ अधिकार अभिलेखामध्ये एकत्र कुटुंबाचे धारण जमिनीचे हिस्स्यांची वाटणी / विभाजनाची कार्यवाही करणे बाबत. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ८५ मध्ये धारण जमिनीचे विभाजन करण्याबाबत तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र जमीनं महसूल (धारण जमिनीचे विभाजन) नियम १९६७ अन्वये नियम निश्चित केलेले आहेत.एकत्र कुटुंबाचे धारण जमिनीचे विभाजन हे नोंदणीकृत वाटणी पत्र तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ८५ मधील तरतुदी अन्वये तसेच दिवाणी न्याय संहिता १९०८ कलम ५४ अन्वये दिवाणी न्यायालयाकडून करण्यात येते.

एकत्र कुटुंबातील धारकांनी धारण केलेल्या शेतजमिनी बाबत नोंदणीकृत वाटणी पत्र किंवा सक्षम अधिकारी यांचे कडील महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ८५ अन्वये आदेश धारकांने पोट-हिस्सा विभाजनासाठी मोजणी अर्ज सादर केलेस, पोट-हिस्सा / विभाजन मोजणी फी मध्ये संबंधित धारकांना सवलत देण्याची बाब शासनाचे विचारधीन होती.त्याद्वारे ७/१२ अधिकार अभिलेखात एकत्र कुटुंबाचे नोंदणीकृत वाटणी पत्र किंवा महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम ८५ चे आदेशान्वये नोंदीचे प्रक्रियेमध्ये विभाजन / पोट-हिस्सा मोजणी कार्यवाही केलेस अधिकार अभिलेख व नकाशे मेळात व अद्यावत होण्यास मदत होईल. त्यामुळे नकाशामध्ये मोजणी द्वारे वेळीच हद्दी,क्षेत्र ,चतु: सीमा यांचे मोजमापांची नोंदी घेतलेने भविष्यातील क्षेत्र , हद्दीबाबतचे वाद कमी होतील. तसेच ७/१२ अधिकार अभिलेख व नकाशे मेळात राहतील.

वरील सर्व बाबी विचारात घेता, एकत्र कुटुंबाच्या धारित जमिनीचे विभाजन तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ८५ अन्वये करण्यात येणाऱ्या विभाजन कार्यवाहीमध्ये पोटहिस्सा/विभाजन मोजणी फीमध्ये धारक/शेतकरी यांना सवलत देण्यात आलेली आहे.

तसेच, राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर भूसंपादन प्रक्रिया सुरू असून, महाराष्ट्र शासनाकडून धारकांचे अधिकार अभिलेख व नकाशे अद्ययावत व सुसंगत ठेवण्याच्या दृष्टीने एकात्मिक व गतिमान (Dynamic) पद्धतीने अभिलेख व नकाशे अद्ययावत करण्याची प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

सदर बाबींचा विचार करून शासनाने एकत्र कुटुंबाच्या नोंदणीकृत वाटणीपत्रानुसार तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ८५ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार धारित जमिनीच्या पोटहिस्सा विभाजनासाठी आकारण्यात येणाऱ्या मोजणी फीमध्ये सवलत देण्याचा निर्णय घेतलेला आहे.तसेच या सोबतच संमतीने पोटहिस्सा मोजणी तसेच दिवाणी न्यायालयाच्या आदेशान्वये करण्यात येणाऱ्या वाटप मोजणी फीमध्ये देखील सवलत लागू करण्यात येत आहे.

त्यानुसार. खालीलप्रमाणे मोजणी फी चे दर आकारण्यात यावेत.

| अ. क्र. | मोजणीचा प्रकार | प्रति पोट-हिस्सा मोजणी फी शुल्क |
|---|---|---|
| १ | एकत्र कुटुंबाचे धारण जमिनीचे नोंदणीकृत वाटणी पत्र आधारे विभाजन /महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ८५ अन्वये विभाजन / संमतीने पोट - हिस्सा/ नोंदणीकृत वाटप / दिवाणी आदेशान्वये वाटप नुसार पोटहिस्सा मोजणी फी | रु.२००/- प्रति पोट-हिस्सा |

उपरोक्त बाबी विचारात घेऊन अशी संमतीने पोटहिस्सा मोजणी प्रकरणे प्राप्त झालेपासुन १ महात निकाली काढण्याबाबत उपअधीक्षक, भूमी अभिलेख यांनी तात्काळ आवश्यक कार्यवाही करावी.

Shailesh N.

19/3

शैलेश नवाल (भा.प्र.से.)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे

प्रत:- सर्व विभागीय आयुक्त.
प्रत:- सर्व जिल्हाधिकारी.
प्रत:- उपसंचालक भूमि अभिलेख, संलग्न जमाबंदी आयुक्त (भूमापन, नागरी भूमापन, एकत्रीकरण ) पुणे.
प्रत:- सर्व उप उपसंचालक भूमि अभिलेख.
प्रत:- सर्व जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख,उप अधिक्षक भूमि अभिलेख.
प्रत:- प्राचार्य, भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी, छ.संभाजीनगर.